1) राज्यपाल :-

प्रश्न राज्यपालाची रचना सांगून अधिकार लिहा. किं राज्यपालाचे अधिकार स्पष्ट करा.

उत्तर :- स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी भारतीय राज्यघटनेतून संसदीय शासन व्यवस्थेचा अवलंब केला आहे. संसदीय शासन व्यवस्थेमुळे केंद्र आणि घटक राज्य यांची सत्ता राष्ट्रपती व राज्यपालाकडे सोपवलेली आहे.

राज्यपाल हा राज्याच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असतो. महाराष्ट्रासह भारतातील सर्व घटक राज्यांच्या राज्यकारभार राज्यपालाच्या नावाने चालतो. राज्याचे सर्व कार्यकारी अधिकार राज्यपाल कडे असतात. राज्यपाल हा राज्यातील घटनात्मक प्रमुख असतो. राज्याची संपूर्ण सत्ता राज्यपालाच्या नावाने मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ वापरतात. राज्यपाल हा राज्यात नाममात्र ~~प्रमुख~~ प्रमुख असतो. प्रत्येक घटक राज्यासाठी एक राज्यपाल असतो.

महाराष्ट्रात विद्यासागर राव हे सध्याचे राज्यपाल आहेत. श्री प्रकाश हे महाराष्ट्राचे पहिले राज्यपाल होते.

राज्यपालाची रचना भारतीय राज्यघटनेतील विविध कलमामध्ये राज्यपालाची रचना नमूद करण्यात आली आहे.

ती पुढीलप्रमाणे आहे :-

1) राज्यपालाची नेमणूक :- भारतीय राज्यघटनेतील कलम 155 नुसार राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती मार्फत केली जाते. परंतू व्यवहारात पंतप्रधानामार्फत राज्यपालाची नेमणूक होते. राज्यपालाच्या नेमणुकीसंदर्भात काही परंपरा निर्माण झाल्या आहेत.

① राज्यपाल दुसऱ्या राज्याचा रहीवाशी असावा. महाराष्ट्रात महाराष्ट्राचे रहीवाशी असणाऱ्या व्यक्तीला राज्यपाल होता येणार नाही.

② एखाद्या राज्यात राज्यपाल नेमण्यापूर्वी त्या राज्याच्या मुख्यमंत्र्याशी चर्चा करावी किंवा मुख्यमंत्र्याची मान्यता मिळवावी.

2) राज्यपालाची पात्रता :-

① तो / ती भारताचा नागरिक असावा.

② त्याच्या वयाला 35 वर्षे पूर्ण झालेली असावी.

③ तो कोणत्याही आर्थिक लाभाच्या पदावर काम करणारा नसावा.

④ नियुक्तीच्या वेळी तो जर संसद किंवा राज्यनिर्मिती मंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा त्याने राज्यपालाचे पद स्विकारण्यापूर्वी सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा.

⑤ तो / ती वेडा, पागल व आर्थिक दिवाळखोर नसावा

3) राज्यपाल पदाचा कार्यकाळ :-

राज्यपाल पदाचा कार्यकाळ सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा असतो. राज्यपालाचे पद राष्ट्रपतीची मर्जी असे पर्यंतच असते. राज्यपाल केव्हाही आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतीकडे देऊ शकतो.

4) राज्यपाल पदाच्या शपथविधी :-

प्रत्येक घटक राज्याच्या राज्यपालास संबंधीत राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पद व गोपनियतेची शपथ देतात.

5) राज्यपालाचे अधिकार व कार्ये :-

राष्ट्रपती प्रमाणेच राज्यपालाला कार्यकारी कायदे विषयक आर्थिक व न्यायविषयक अधिकार प्राप्त आहे परंतु राज्यपालाला राष्ट्रपतीप्रमाणे सैन्य व आणबाणी विषयक अधिकार प्राप्त नाहीत.

भारतीय राज्यघटनेने राज्यपालास दिलेल्या अधिकार व कार्ये.

1) कार्यकारी किंवा शासनविषयक अधिकार :-

① राज्यपाल हा घटकराज्याचा कार्यकारी अध्यक्ष असल्यामुळे घटकराज्याचा शासन कारभार त्यांच्याच नावाने चालतो. तसेच राज्यातील सर्व आदेश राज्यपालांच्या नावानेच निघतात.

② राज्याच्या मंत्रीमंडळातील विविध खात्यांची वाटणी करण्याविषयीचे नियम राज्यपाल करतो.

③ मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाची निवड करणे.

④ राज्याच्या महाधी वक्त्याची नियुक्ती करणे. महाधीवक्त्याचे वेतन व भत्ते निश्चित करणे.

⑤ राज्य मुख्यनिवडणूक आयुक्ताची निवड करणे.

⑥ राज्यलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व

⑦ मुख्यमंत्र्यांकडून प्रशासन आणि कायदेविषयक माहिती मागवणे.

⑧ राज्यात राष्ट्रपती शासन लागू करण्याची शिफारस

राष्ट्रपतीला करणे. राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून राज्या- काम पाहणे. राष्ट्रपती शासनाच्या कालावधीत राज्यपा- लाच्या अधिकारात वाढ होते.

⑨ राज्यातील विविध विद्यापिठांच्या कुलगुरुची नियुक्ती करणे राज्यपाल राज्यातील विद्यापीठांचा कुलपती असतो.

⑩ राज्यातील जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, दुय्यम न्यायालयाचे न्यायाधीश यांची निवड करणे.

याशिवाय राज्यातील शासन व्यवस्थे संबंधीचे अहवाल राष्ट्रपतीला सादर करण्याचे कार्य राज्यपालाला करावे लागते.

२) कायदेविषयक अधिकार :-

राज्यपाल राज्यविधीमंडळाचा सदस्य नसतो. परंतु तो राज्यविधी मंडळाचा अविभाज्य भाग समजला जातो. त्यामुळेच राज्यपालाला काही कायदेविषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत.

1) राज्यविधीमंडळाचे अधिवेशन बोलावणे.

2) राज्यविधीमंडळाच्या अधिवेशनाची समाप्ती करणे.

3) विधानसभा विसर्जित करणे.

4) अभिभाषण देणे विधानसभेच्या निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या अधिवेशनापूर्वी सभागृहाला कोणत्याही विधेयकाबाबत संदेश पाठवणे.

5) विधानसभेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे पद रिक्त असल्यास त्या जागी कोणाचीही नियुक्ती करणे, साहित्य विज्ञान, कला, सहकार, समाजसेवा या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची विधान परिषदेवर नेमणूक करणे.

६) विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना एखाद्या काय- ची गरज भासल्यास त्या बाबतचा वटहूकूम काढ
७) राज्यविधीमंडळातर्फे संमत झालेली काही विधेयके रा- पतीच्या मान्यतेसाठी राखून ठेवणे. उदा. संपत्ती जप्त करण्यासंबंधीचे विधेयक, उच्च न्यायालयाचे अधिकार कमी करण्याविषयीचे विधेयक, संविधानाच्या विरुद्ध असलेले विधेयक, मार्गदर्शक तत्वांच्या विरुद्ध अ- विधेयक, राष्ट्रीय हिताच्या विरुद्ध असलेली विधेयके
८) राज्यवित्त आयोग, राज्यलोकसेवा आयोग आणि निय- व महालेखा परिक्षकांचा अहवाल विधानसभेला सादर करणे.
९) निर्वाचन आयोगाच्या सल्ल्यानुसार विधी मंडळातील एख- सदस्य अपात्र असल्याचे स्पष्ट झाले असता त्या सभा- दाचे सदस्यत्व रद्द करणे.

वरीलप्रमाणे सर्व कायदेविषयक कार्ये राज्य- ला करावे लागते. या सर्व कार्य यांची पूर्तता राज्यपाल मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाच्या मदतीने करतो.

३) अधिकार आर्थिक अधिकार :-

भारतीय संविधानाने राज्यपालास खालील आर्थिक अधिकार दिलेले आहेत.

१) अंदाजपत्रक (धनविधेयक) विधानसभेत मांडण्यापूर्वी राज- लाची संमती घ्यावी लागते.

२) राज्यपालाच्या परवानगी शिवाय कोणत्याही अनुदान- मागणी करता येत नाही.

३) पंचायत व नगरपालीकांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी दर पाच वर्षाने वित्तआयोगाची स्थापना राज- ल करतो.

4) राज्याच्या आकस्मिक निधीवर राज्यपालचे नियंत्रण असते. राज्यपालच्या मान्यतेशिवाय या निधीतून शासनाला खर्च करता येत नाही.

5) राज्याच्या संचित निधीवर राज्यपालचे नियंत्रण असते. या निधीचा खर्च शासनाला राज्यपालाची परवानगी घेऊनच करावा लागतो. या निधीच्या खर्चासंबंधी विधीमंडळात चर्चा करता येत नाही.

4) न्यायालयीन अधिकार :-

राष्ट्रपतीप्रमाणेच घटक राज्यातील राज्यपालांना खालील न्यायालयीन अधिकार आहेत.

1) जिल्हा न्यायालयीतील न्यायाधिशांच्या नियुक्त बदल्यात व पदती उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधिश व मुख्यमंत्र्याशी चर्चा करून राज्यपाल करतो.

2) गुन्हेगाराची शिक्षा कमी करणे, शिक्षेचे स्वरूप बदलणे किंवा माफी देण्याचा अधिकार राज्यपालचा आहे.

3) घटकराज्याच्या उच्चन्यायालयातील न्यायाधिशांची नेमणूक करताना राष्ट्रपती राज्यपालाशी सल्लामसलद करतो.

5) स्वविवेकाधीन अधिकार :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम 163 नुसार राज्यपाल ला स्वतः च्या सदसद्विवेक बुद्धीने काही काम करता येतात. राज्यपालाने नेहमीच मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसारच कार्य करावे असे नाही. खालील काही कार्य तो स्वतः च्या सदसद्विवेक बुद्धीने करू शकतो.

1) राज्यात राष्ट्रपती राजवटीची शिफारस करणे.

2) विधानसभा विर्सजित करणे.

3) केंद्रशासित राज्याचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणे.

५) मंत्रीमंडळ अल्पमतात असल्यास राज्यविधान सभेचे विसर्जन करणे किंवा बरखास्त करणे.

५) राज्याच्या प्रशासकीय बाबींची माहिती मुख्यमंत्र्या मागविणे.

६) विधानसभेने पारित केलेले कोणतेही साधारण विधे राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठविणे.

७) राज्याच्या मुख्यमंत्र्याची नियुक्ती करणे.

८) विधीमंडळाचे अधिवेशन बोलावणे.

वरीलप्रमाणे सर्व स्वविवेकाधीन अधि राज्यपालाला आहेत. भारताच्या संविधानात आसाम व नागालँडच्या राज्यपालाला स्वविवेकाधीन अधिकार नस नोंद आहे. स्वविवेकाधीन अधिकार त्या त्या घटक राजकीय परिस्थितीवर अवलंबून असतात.

वरील अधिकाराशिवाय राज्यपालास राष्ट्र च्या निर्देशानुसार काही विशेष जबाबदाऱ्या पार पा लागतात.

1) कलम 371 नुसार महाराष्ट्राचा राज्यपाल विदर्भ आ मराठवाड्यासाठी स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना क शकतो.

2) कलम 371 दोन नुसार गुजरातचा राज्यपाल सौरा आणि कच्छ साठी स्वतंत्र विकास मंडळाची स्थापन करू शकतो.

3) कलम 371 बी नुसार आसाममधील आदिवासी प्रदेश प्रशासनाविषयी

4) कलम 371 एच नुसार अरुणाचल प्रदेशात कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी राज्यपाला आहे.